# भूमिका

प्रवासवर्णन हा एक ललित वाङ्‌मय प्रकार मानला जातो. भावनात्मक जीवनदर्शन हे साहित्याचे अतरंग कोणत्याही वाङ्‌मयप्रकारातून आपणास प्रतीत होत असतेच, तरीही त्याला वाङ्‌मयप्रकाराच्या विषय क्षेत्रामुळे व अभिव्यक्ती वैशिष्टयामुळे त्याला त्याचा असा खास आकार येतो. प्रवासवर्णनाचा विचार करता मानवी मनाच्या एकाच स्वाभाविक प्रवृत्तीतून प्रवास वर्णनपर वाङ्‌मय जन्माला येत असते. या वाङ्‌मयप्रकाराची प्रेरणा विशद करतांना डॉ. अ. ना. देशपांडे म्हणतात " आपण पाहिलेला नवा मुलुख तेथील लोकाचार, तेथील निसर्ग, जाता येता अनुभवलेले सुखाचे व संकटाचे प्रसंग याची माहिती दुस-याला सांगण्याची जी स्वभाव सहज उत्सुकता मनुष्याच्या ठिकाणी असते तीच मुख्यत: प्रवासवर्णनपर वाङ्‌मयाच्या निर्मितीला कारणीभूत झालेली आहे.

प्रा. अनंत काणेकरांच्या पूर्वीची प्रवासवर्णने ही जंत्रीवजा, स्थलवाचक असत. परंतु काणेकरांच्या मूळच्या कवि मनाच्या पिंडामुळे त्यांच्या प्रवासवर्णनपर लेखनाला एक आगळा कलात्मक स्पर्श झालेला आहे. त्यातून त्यांची काव्यात्मकताही लक्षात येते. त्यांच्या प्रवासवर्णनाची शीर्षकेही बोलकी आणि काव्यात्मक आहेत. विशेष म्हणजे अनंत काणेकरांच्या प्रवासवर्णन-पर लिखाणामुळे मराठी ललित गद्य वाङ्‌मयाला गतिशीलता प्राप्त झाली. प्रवास वर्णनाचे स्वरूप बदलले हे लक्षात घेता प्रा. अनंत काणेकर हे 'प्रवासवर्णनाच्या वाटचालीवरील पहिला दीपस्तंभ' ठरले हे लक्षात आल्यामुळे मला प्रा. अनंत काणेकरांच्या प्रवासवर्णनाचा अभ्यास करावा असे वाटू लागले. काणेकरांच्या " धुक्यातून लाल ता-याकडे ", " आमची माती आमचे आकाश " , " निळे डोंगर तांबडी माती " , " सोनेरी उन्हात पाचूची बेटे", " रक्ताची फुले " ," खडक कोरतात आकाश " पैकी " खडक कोरतात आकाश " व " निळे डोंगर तांबडी माती " ही दोन प्रवास वर्णने माझ्या प्रबंधिकेच्या अभ्यासासाठी निवडली.

पूर्वाभ्यास -

कविता, कथा, लघुनिबंध याबरोबरच प्रवासवर्णनकार म्हणून आपले एक वेगळे स्थान निर्माण करणाऱ्या कार्णिकरांनी " धुक्यातून लाल ताऱ्याकडे ", " आमची माती आमचे आकाश ", " निळे डोंगर तांबडी माती ", " सोनेरी उन्हात पाचूची बेटे ", " रक्ताची फुले आणि " खडक कोरतात आकाश " इ. प्रवासवर्णने लिहिली आहेत. या प्रवासावर वेळोवेळी अनेकांनी लेखन केले आहे. " खडक कोरतात आकाश " स्फुट स्वरूपाचे लेखन झाले आहे उदा. कार्णिकर आणि त्यांचे प्रवासलेखन - वा.ल. कुलकर्णी, ललित गद्य ( प्रदक्षिणा ) भीमराव कुलकर्णी, मराठी साहित्य दर्शन - संपा. प्रा.श्री.धारे, " प्रवासवर्णन एक वाङ्मय प्रकार " - डॉ. वसंत सावंत इ. पण " खडक कोरतात आकाश " व " निळे डोंगर तांबडी माती " यावर स्वतंत्ररित्या कुठे अभ्यास झाल्याचे न आढळल्यामुळे मला या प्रबंधिकेच्या द्वारे या दोन प्रवासवर्णपर पुस्तकाचा अभ्यास करावयाचा आहे.